**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ /२०२४ दिनांक :- / /२०२४

**प्रसिद्धिपत्रक**

**गणेशखिंड रोडवरील, पुणे विद्यापीठ चौक ते शिवाजीनगर कोर्ट दरम्यान टाटा मेट्रोचे काम सुरु आहे. सदर ठिकाणी टाटा मेट्रोची खालील कामे करावयाची आहेत.**

१. पुणे विद्यापीठ चौकामध्ये पोर्टर बीमचे बांधकाम करणे
२. PMR २० मेट्रो स्टेशन – (आरबीआय समोर) स्टेशनचे गर्डर लॉचिंग करणे.
३. सिमला ऑफिस चौकाचे पुढे COEP हॉस्टेलच्या बाजुस पाणीपुरवठा लाईन स्थलांतरीत करणे व ५ नविन पिलर्सची उभारणी करणे.

**गणेशखिंड रोडवरील टाटा मेट्रोच्या बांधकामा दरम्यान वाहतूक सुरळीत व सुरक्षित सुरु राहण्याकरीता व वाहतूक कोंडी होवु नये म्हणुन वाहतूकीमध्ये बदल करणे गरजेचे आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मी रोहिदास पवार, पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पुणे शहर, दिनांक ०१/०६/२०२४ पासुन पुढील आदेशापर्यंत वाहतूकीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात प्रायोगीक तत्वावर खालीलप्रमाणे बदल करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी असलेले वाहतूकीचे सर्व आदेश रद्द समजण्यात येतील.**

**पुणे विद्यापीठ चौकामध्ये नविन पोर्टल बीमचे बांधकाम करणे.**

❖ **औंध रोडवरील ब्रेमेन चौकामधुन पुणे विद्यापीठ चौकामध्ये येणा-या फक्त दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांना प्रवेश आहे.(मार्ग- ब्रेमेन चौक औंध रोडने सरळ पुणे विद्यापीठ मुख्य प्रवेशद्वारामधुन जावुन उजवीकडे वळण घेवुन व्हॅमनीकॉमचे मुख्य प्रवेशद्वारातुन गणेशखिंड रोडवर येतील.)**
**सर्व प्रकारची मालवाहतूक करणारी वाहने, PMPML बसेस, लक्झरी बसेसना प्रवेश बंद राहील.**

**पर्यायी मार्ग :-** १. शिवाजीनगर , डेक्कन परिसरामध्ये जाण्यासाठी ब्रेमेन चौक डावीकडे वळण घेवुन जयकर पथावरुन आंबेडकर चौक सरळ साई चौक उजवीकडे वळण घेवुन सिंफनी चौक (रेंजहिल) डावीकडे वळण घेवुन युनीट ४ क्राईम ब्रॉच येथुन उजवीकडे वळण घेवुन कृषी महाविद्याल यामधील रस्त्याने न.ता.वाडी चौक सरळ सिमला चौक पुढे इच्छित स्थळी.

**२. आर.टी.ओ. पुणे स्टेशन, नगररोड कडे जाणा-या वाहनांनी**

अ. ब्रेमेन चौक डावीकडे वळण घेवुन आंबेडकर चौक डावीकडे वळण घेवुन बोपोडी चौकमार्गे

**किंवा**

ब. आंबेडकर चौक सरळ साई चौक सरळ खडकी पोलीस स्टेशन बाजुचा रेल्वे अंडरपासमार्गे

**किंवा**

क. युनीट ४ समोरुन सरळ पोल्ट्री अंडरपास मार्गे जावे.

❖ **हिंजवडी सांगवी परिसरामधुन येवुन सेनापती बापट रोड वर जाणा-या PMPML बसेस ॠषी मल्होत्रा चौकामधुन उजवीकडे वळण घेवुन परिहार चौक डावीकडे वळण घेवुन बाणेर रोड वरुन विद्यापीठ चौक मार्गे धावतील.**

**मेट्रो स्टेशन PMR २० (आर. बी. आय. समोर) चे गर्डर लॉंचिंग करणेसाठी खालील प्रमाणे वाहतूकीमध्ये बदल करण्यात येत आहे.**

❖ **विद्यापीठ चौकामधुन रेंजहिल्स चौकापासुन पुढे शिवाजी नगरकडे येण्यासाठी गणेशखिंड रोडवरुन सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद राहील.**

**पर्यायी मार्ग :-** रेंज हिल्स कॉर्नर डावीकडे वळण घेवुन रेंज हिल्स रोडने सिंफनी सर्कल उजवीकडे वळण घेवुन क्राईम ब्रॉंच युनिट ४ ऑफिस समोरुन

१. शिवाजीनगर, डेक्कन परिसरामध्ये जाण्यासाठी उजवीकडे वळण घेवुन कृषी महाविद्यालयामधुन न.ता.वाडी चौक सरळ सिमला ऑफिस चौकामधुन इच्छित स्थळी जातील.

२. आर.टी.ओ, पुणे स्टेशन परिसर, नगर रोड कडे जाण्यासाठी युनिट ४ ऑफिस समोरुन सरळ रेल्वे अंडरपास मधुन पोल्ट्री फार्म चौकामधुन इच्छित स्थळी जातील.

**COEP हॉस्टेलच्या बाजुने ५ पिलरचे बांधकाम करणे**

❖ **सिमला ऑफिस चौकामधुन COEP हॉस्टेलच्या बाजुने स.गो.बर्वे चौकाकडे प्रवेश बंद राहील.**

**पर्यायी मार्ग :-** सिमला ऑफिस चौकामधुन संचेती हॉस्पीटल समोरुन उजवीकडे वळण घेवुन स.गो.बर्वे चौक

**किंवा**

सिमला ऑफिस चौकामधुन संचेती हॉस्पीटल अंडरपास मधुन सरळ कामगार पुतळा चौक उजवीकडे वळण घेवुन कोर्टा समोरुन इच्छित स्थळी जातील.

❖ **सिमला ऑफिस चौकामधुन संचेती अंडरपास मार्गे कामगार पुतळा चौक या मार्गावर दररोज रात्रौ २२.०० ते सकाळी ०७.०० वा पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद राहील.**

**पर्यायी मार्ग :-** सिमला ऑफिस चौकामधुन संचेती हॉस्पीटल चौक उजवीकडे वळण घेवुन स.गो.बर्वे चौक मार्गे जावे किंवा

संचेती चौकामधुन डावीकडे वळण घेवुन इंजीनियरिंग कॉलेज चौक उजवीकडे वळण घेवुन आर.टी.ओ चौक मार्गे जावे.

❖ **पुणे मुंबई महामार्गावरुन पोल्ट्री फार्म चौकामधुन रेल्वे अंडरपासमार्गे रेंजहिल्स कडे सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद राहील.**

**पर्यायी मार्ग :-** पोल्ट्री फार्म चौकामधुन – पुणे - मुंबई महामार्गावरुन चर्च चौक डावीकडे वळण घेवुन खडकी पो.ठाणे जवळील रेल्वे अंडरपास मधुन साई चौकामधुन इच्छित स्थळी जातील.

**१) रेंजहिल्स कॉर्नर ते सिंफनी चौक ते साई चौक व सिंफनी चौक ते युनिट – ४ क्राईम ब्रॉंच ते रेल्वे अंडरपास व कृषीमहाविद्यालयमधील रस्त्यांवर सर्व प्रकारच्या वाहनांसाठी नो पार्किंग, नो हॉल्टींग करण्यात येत आहे.**

**२) ब्रेमेन चौक चे आंबेडकर चौक ते साई चौक दरम्यान रस्त्यांवर सर्व प्रकारच्या वाहनांसाठी नो पार्किंग, नो हॉल्टींग करण्यात येत आहे.**

**( रोहिदास पवार )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रति,**
सर्व संबंधितांना